महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक :** क्रमांक:२२५३/१४७७/(१)/उ.ता./मनासे/२०२३/१६ **दिनांक :-** ०७ जून, २०२३

**- घोषणा -**

**विषय :-** महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२३ या स्पर्धा परीक्षेच्या प्रथम उत्तरतालिकेवरील हरकती सादर करण्याबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक ४ जून, २०२३** रोजी घेण्यात आलेल्या '**महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२३**' या स्पर्धा परीक्षेच्या प्रश्नपुस्तिका क्रमांक १ व प्रश्नपुस्तिका क्रमांक २ या विषयांच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपुस्तिकांच्या चारही संचाच्या प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

२. सदर परीक्षेमधील खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या आकृत्यांवर / नकाशांवर आधारित प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांना सवलत देण्याचे प्रस्तावित आहे, याची दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| | **संच A मधील प्रश्न क्रमांक** | **संच B मधील प्रश्न क्रमांक** | **संच C मधील प्रश्न क्रमांक** | **संच D मधील प्रश्न क्रमांक** |
|---|---|---|---|---|
| **प्रश्नपुस्तिका क्रमांक १** | **२१** | **२९** | **३४** | **३३** |
| **प्रश्नपुस्तिका क्रमांक २** | **५१** | **७१** | **५६** | **६६** |
| | **५२** | **७२** | **५७** | **६७** |
| | **५७** | **६४** | **६७** | **५२** |
| | **६१** | **५६** | **५१** | **७४** |
| | **६७** | **५२** | **७२** | **६४** |
| | **७१** | **६६** | **६१** | **५६** |

३. प्रस्तुत परीक्षेसाठी उपस्थित उमेदवारांना उत्तरतालिकेवर हरकती सादर करावयाच्या असल्यास, आयोगाच्या संकेतस्थळावरील दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ व १ जुलै, २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकामध्ये नमूद कार्यपध्दतीनुसार केवळ ऑनलाईन पध्दतीने व विहित शुल्काचा भरणा करुन हरकती सादर करणे आवश्यक आहे.

४. विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील अथवा अन्य कोणत्याही मार्गाने/पध्दतीने सादर करण्यात आलेल्या हरकती तसेच विहित शुल्काचा भरणा न केलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५. उत्तरतालिकेबाबत हरकती सादर करण्याची सुविधा **दिनांक १२ जून,२०२३** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत सुरु राहील.

६. ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात कोणत्याही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर तसेच support-online@mpsc.gov.in या ईमेलवरुन विहित कालावधीत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

परीक्षा नियंत्रक व सहसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई

ठिकाण : बेलापूर सीबीडी, नवी मुंबई